महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
"कस्तुरी बिल्डीग" तळ मजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८८०११६/११८/विस्तारीत/-४१० EMail ID :- aao.prashakosha-mh@mah.gov.in

संदर्भः

१. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.पीएवाय-१०८२/सीआर-११००(एक)/एसईआर-३, दि.०६.११.१९८४
२. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५.
३. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, वित्त विभाग क्र.११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.०१.०४.२०१०.
४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन वित्त विभाग क्र.वेतन/११११ प्र.क्र.८/सेवा-३ , दि.०१.०७.२०११
५. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.आप्रयो/१०१५ प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ ,दि.२३.१२.२०१५

*******************************************************************************************

क्र.संलेको/प्रशा कोषा/कार्या.३/आप्रयो लाभ /२०२५/ १80 दिनांक : 17 FEB 2026

## //आदेश//

**विषय :- राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत २४ वर्षाचा दुसरा लाभ सहायक लेखा अधिकारी या पदाचा अनुज्ञेय करणेबाबत.**

उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ वरील गट क व गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे कुंठीतता घालवण्यासाठी १२ वर्षे व २४ वर्षाच्या सेवेनंतर सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे.

त्यानुसार संचालनालयाच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत २४ वर्षाचा सहायक लेखा अधिकारी या पदाचा लाभ त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या दिनांकापासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करीत आहेत.

संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ :

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव सध्याचे पदनाम, विभाग | शासन सेवेतील नियुक्तीचा दिनांक व पद | नियुक्ती नंतर मिळालेल्या पहिल्या लाभाचा दिनांक व पदनाम | नियुक्ती नंतर मिळालेल्या पदोन्नतीचा दिनांक व पदनाम | सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक व पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. भगवान दामोदर म्हात्रे, (सेवानिवृत्त सहायक लेखा अधिकारी), दि.३१.१०.२०१७ कोंकण विभाग | ०८.०१.१९८७ कनिष्ठ लिपिक | ०८.०१.१९९९ वरिष्ठ लिपिक | ३०.०७.२००१ वरिष्ठ लेखापाल | ३०.०७.२०१३ सहायक लेखा अधिकारी |
| २ | श्री. संजय गणपत नाटेकर, सेवानिवृत्त उपलेखापाल दि.३१.०३.२०१६ कोंकण विभाग | ०९.०७.१९८५ कनिष्ठ लिपिक | ०९.०७.१९९७ वरिष्ठ लिपिक | ३०.०६.२००१ वरिष्ठ लेखापाल | ३०.०६.२०१३ सहायक लेखा अधिकारी |
| ३ | श्री. पद्मन त्र्यंबक सावंत, (सेवानिवृत्त सहायक लेखा अधिकारी), दि. ३१.०५.२०१३ कोंकण विभाग | ०३.०९.१९८२ कनिष्ठ लिपिक | ०१.१०.१९९४ वरिष्ठ लिपिक | २७.११.१९९७ वरिष्ठ लेखापाल<br>०७.१०.२०११ सहायक लेखा अधिकारी | २७.११.२००९ सहायक लेखा अधिकारी |

**अटी व शर्ती:-**

१. संबंधित कार्यालय प्रमुखांनी सोबतच्या यादीतील कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून देण्यात यावा.

२. संबधित कर्मचाऱ्यांचा वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीकरिता विकल्प घेण्यात यावा व त्यानुसार वेतननिश्चिती करण्यात यावी.

३. संदर्भ क्र.३ अन्वये ज्या कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने चा दुसरा लाभ दि.०१.०४.२०१० पूर्वी अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांची दि. ०१.१०.२००६ ते ३१.०३.२०१० पर्यत काल्पनिकरित्या वेतननिश्चिती करुन प्रत्यक्ष लाभ दि.०१.०४.२०१० पासून अनुज्ञेय होईल मात्र दि.०१.१०.२००६ ते दि. ३१.०३.२०१० पर्यतच्या कालावधीच्या थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

४. सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी त्यांना संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदीच्या अधीन राहून नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतननिश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतननिश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणेच करण्यात येईल. मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमित / कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

५. संदर्भ क्र.५ वरील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या वा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात यावेत, मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येऊ नये. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात यावी.

सदरचे आदेश www.mahakosh.maharashtra.gov.in या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

16/2/26

**(दीपा देशपांडे)**
**संचालक, लेखा व कोषागारे**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत –**

१. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोंकण विभाग
२. संबंधित कर्मचारी (सहसंचालक कार्यालयामार्फत).
३. निवड नस्ती (प्रशा कोषा)